असा. क्र. ६१ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**मंगळवार, नोव्हेंबर २९, २००५/अग्रहायण ८, शके १९२७**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ११.**—मुंबई दारूबंदी अधिनियम, १९४९ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अध्यादेश. . . . . | ५१४-५२३ |

## गृह विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २९ नोव्हेंबर २००५.

**MAHARASHTRA ORDINANCE No. XI OF 2005.**

AN ORDINANCE

FURTHER TO AMEND THE BOMBAY PROHIBITION ACT, 1949.

**सन २००५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ११.**

**मुंबई दारूबंदी अधिनियम, १९४९ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

१९४९ चा मुंबई २५. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, मुंबई दारूबंदी अधिनियम, १९४९ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, मुंबई दारूबंदी (सुधारणा) अध्यादेश, २००५ असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ४३ ची सुधारणा.

**२.** मुंबई दारूबंदी अधिनियम, १९४९ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ४३ मध्ये,— १९४९ चा मुंबई २५.

(क) पोट-कलम (१) मध्ये, " किंवा जेथे लोकांना प्रवेश मिळू शकतो अशा हॉटेलातील किंवा संस्थेतील खोलीत " हा मजकूर वगळण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (२) वगळण्यात येईल.

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ६५ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६५ मध्ये,—

(क) खंड (क) मध्ये, " किंवा निर्यात करील " या मजकुरानंतर, " किंवा तिचे परिवहन करील, " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) खंड (ङ) मध्ये, " किंवा विकत घेईल " या मजकुरानंतर, " किंवा जवळ बाळगील " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) " तीन वर्षांपर्यंत " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " द्रव्यदंडाची शिक्षा होईल : " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, " तीन वर्षांपेक्षा कमी नसेल, परंतु, पाच वर्षांपर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा पंचवीस हजार रुपयांपेक्षा कमी नसेल, परंतु, पन्नास हजार रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील. " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(घ) परंतुक वगळण्यात येईल.

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ६६ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६६ मधील, पोट-कलम (१) मध्ये,—

(क) खंड (ख) मध्ये, " सेवन करील, वापरील, जवळ बाळगील किंवा तिचे परिवहन करील, " या मजकुराऐवजी, " सेवन करील किंवा वापरील " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) परिच्छेद (एक) मध्ये,—

(एक) " एक हजार रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी, " दहा हजार रुपयांपर्यंत " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) परंतुकामध्ये, " पाचशे रुपयांपेक्षा " या मजकुराऐवजी, " पाच हजार रुपयांपेक्षा " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) परिच्छेद (दोन) मध्ये,—

(एक) " दोन हजार रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी, " वीस हजार रुपयांपर्यंत " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) परंतुकामध्ये " एक हजार रुपयांपेक्षा " या मजकुराऐवजी, " दहा हजार रुपयांपेक्षा " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(घ) परिच्छेद (तीन) मध्ये,—

(एक) " दोन हजार रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी, " वीस हजार रुपयांपर्यंत " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) परंतुकामध्ये, " एक हजार रुपयांपेक्षा " या मजकुराऐवजी, " दहा हजार रुपयांपेक्षा " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

५. मुख्य अधिनियमाच्या कलम ६७ मधील, पोट-कलम (१) मध्ये,— सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ६७ ची सुधारणा.

(क) " एक वर्षापर्यंत वाढविता येऊ शकेल " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल : " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, " तीन वर्षांपेक्षा कमी नसेल, परंतु, पाच वर्षांपर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा पंचवीस हजार रुपयांपेक्षा कमी नसेल, परंतु, पन्नास हजार रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील. " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) परंतुक वगळण्यात येईल.

६. मुख्य अधिनियमाच्या कलम ६७-१ क मधील, पोट-कलम (१) मध्ये,— सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ६७-१ क ची सुधारणा.

(क) " एक वर्षापर्यंत वाढविता येऊ शकेल, " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल : " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, " तीन वर्षांपेक्षा कमी नसेल, परंतु, पाच वर्षांपर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा पंचवीस हजार रुपयांपेक्षा कमी नसेल, परंतु, पन्नास हजार रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील. " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) परंतुक वगळण्यात येईल.

७. मुख्य अधिनियमाच्या कलम ६७-१ ख मध्ये, " एक हजार रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी " दहा हजार रुपयांपर्यंत " हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ६७-१ ख ची सुधारणा.

८. मुख्य अधिनियमाच्या कलम ६७ क मधील, पोट-कलम (१) मध्ये, " द्रव्यदंडाची शिक्षा होईल " या मजकुराअगोदर, " दहा हजार रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल. सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ६७-क ची सुधारणा.

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ६७-ख ची सुधारणा.

९. मुख्य अधिनियमाच्या कलम ६७-ख मधील, पोट-कलम (२) मध्ये, " द्रव्यदंडाची शिक्षा होईल " या मजकुराअगोदर, " दहा हजार रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ६७-ग ची सुधारणा.

१०. मुख्य अधिनियमाच्या कलम ६७-ग मध्ये, " तर तिला सिद्धापराध ठरविण्यात आले असता " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " नऊ महिन्यांपेक्षा कमी असणार नाही व असा द्रव्यदंड एक हजार रुपयांपेक्षा कमी असणार नाही " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, " तर तिला, सिद्धापराध ठरविण्यात आले असता, तीन वर्षांपेक्षा कमी नसेल, परंतु, पाच वर्षांपर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा पंचवीस हजार रुपयांपेक्षा कमी नसेल, परंतु, पन्नास हजार रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ६८ ची सुधारणा.

११. मुख्य अधिनियमाच्या कलम ६८ मध्ये, " तिला, सिद्धापराध ठरविण्यात आले असता, अशा प्रत्येक अपराधादाखल " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " एक वर्षापेक्षा कमी असणार नाही आणि अशी द्रव्यदंडाची रक्कम एक हजार रुपयांपेक्षा कमी असणार नाही " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, " तिला, सिद्धापराध ठरविण्यात आले असता, तीन वर्षांहून कमी नसेल, परंतु, पाच वर्षांपर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा पंचवीस हजार रुपयांपेक्षा कमी नसेल, परंतु, पन्नास हजार रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ६९ ची सुधारणा.

१२. मुख्य अधिनियमाच्या कलम ६९ मध्ये,—

(क) परिच्छेद (एक) मधील, " तिला, सिद्धापराध ठरविण्यात आले असता, " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " नऊ महिन्यांपेक्षा कमी असणार नाही व असा द्रव्यदंड एक हजार रुपयांपेक्षा कमी असणार नाही " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, " तिला, सिद्धापराध ठरविण्यात आले असता, दोन वर्षांपर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा पन्नास हजार रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील. " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) विद्यमान दुसऱ्या परंतुकामध्ये, " परंतु, आणखी असे की, " या मजकुराऐवजी " परंतु, " हा शब्द दाखल करण्यात येईल.

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ७० ची सुधारणा.

१३. मुख्य अधिनियमाच्या कलम ७० मध्ये, " सहा महिन्यांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल किंवा एक हजार रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल " या मजकुराऐवजी, " तीन वर्षांपेक्षा कमी नसेल, परंतु, पाच वर्षांपर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा पंचवीस हजार रुपयांपेक्षा कमी नसेल, परंतु, पन्नास हजार रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**१४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७२ मध्ये, " एक वर्षापर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल किंवा एक हजार रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल " या मजकुराऐवजी, " तीन वर्षांपेक्षा कमी नसेल, परंतु, पाच वर्षांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा पंचवीस हजार रुपयांपेक्षा कमी नसेल, परंतु, पन्नास हजार रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल " हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ७२ ची सुधारणा.

**१५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७३ मध्ये, " पाचशे रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी, " पाच हजार रुपयांपर्यंत " हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ७३ ची सुधारणा.

**१६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७४ मध्ये, " एक हजार रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी, " दहा हजार रुपयांपर्यंत " हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ७४ ची सुधारणा.

**१७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७५ मध्ये, " एक हजार रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी, " दहा हजार रुपयांपर्यंत " हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ७५ ची सुधारणा.

**१८.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७५-क मध्ये,— सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ७५-क ची सुधारणा.

(क) खंड (क) मध्ये, " किंवा जेथे लोकांस प्रवेश मिळू शकतो अशा हॉटेलातील किंवा परिसंस्थेतील खोलीत " हा मजकूर वगळण्यात येईल ;

(ख) खंड (ख) वगळण्यात येईल ;

(ग) " एक हजार रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी, " दहा हजार रुपयांपर्यंत " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**१९.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७६ मध्ये, " दोनशे रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी, " दोन हजार रुपयांपर्यंत " हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ७६ ची सुधारणा.

**२०.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७७ मध्ये, " पाचशे रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी, " पाच हजार रुपयांपर्यंत " हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ७७ ची सुधारणा.

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ७८ ची सुधारणा.

**२१.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७८ मध्ये, " सहा महिन्यांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल व एक हजार रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल " या मजकुराऐवजी, " एक वर्षापर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि दहा हजार रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ७९ ची सुधारणा.

**२२.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७९ चे परंतुक वगळण्यात येईल.

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ८२ ची सुधारणा.

**२३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ८२ मधील, पोट-कलम (१) मध्ये, " पाचशे रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी, " पाच हजार रुपयांपर्यंत " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ८३ ची सुधारणा.

**२४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ८३ मध्ये, " दोन वर्षांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या कालावधीच्या कारावासाची शिक्षा होईल किंवा एक हजार रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल " या मजकुराऐवजी, " तीन वर्षांपेक्षा कमी नसेल, परंतु, पाच वर्षांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा पंचवीस हजार रुपयांपेक्षा कमी नसेल, परंतु, पन्नास हजार रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ८४ ची सुधारणा.

**२५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ८४ मध्ये, " पाचशे रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी " पाच हजार रुपयांपर्यंत " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ८५ ची सुधारणा.

**२६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ८५ मधील, पोट-कलम (१) मध्ये,---

(क) खंड (क) मध्ये,---

(एक) " एक हजार रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी, " दहा हजार रुपयांपर्यंत " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) परंतुकामध्ये, " पाचशे रुपयांपेक्षा " या मजकुराऐवजी, " पाच हजार रुपयांपेक्षा " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) खंड (ख) मध्ये,---

(एक) " एक हजार रुपये " या मजकुराऐवजी, " दहा हजार रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) परंतुकामध्ये, " एक हजार रुपयांपेक्षा " या मजकुराऐवजी, " सात हजार पाचशे रुपयांपेक्षा " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

२७. मुख्य अधिनियमाच्या कलम ८६ मध्ये,— सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ८६ ची सुधारणा.

(क) पोट-कलम (१) मध्ये,—

(एक) " एक हजार रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी, " दहा हजार रुपयांपर्यंत " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) परंतुकामध्ये, " पाचशे रुपयांपेक्षा " या मजकुराऐवजी, " पाच हजार रुपयांपेक्षा " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (२) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

" (२) ज्याने आपली जागा कोणत्याही कराराअन्वये भाडेपट्ट्याने दिली आहे अशा कोणत्याही मालकाला, भाडेकरूने त्याच्या ताब्यात असलेल्या जागेत केलेल्या, पोट-कलम (१) खालील अपराधासाठी, जोपर्यंत तो मालक अशा अपराधामध्ये सक्रियपणे गुंतला आहे असे शाबीत होत नाही तोपर्यंत, जबाबदार धरले जाणार नाही. ".

२८. मुख्य अधिनियमाच्या कलम ८७ मध्ये, " एक हजार रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी, " दहा हजार रुपयांपर्यंत " हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ८७ ची सुधारणा.

२९. मुख्य अधिनियमाच्या कलम ८८ मध्ये, " एक हजार रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी, " दहा हजार रुपयांपर्यंत " हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ८८ ची सुधारणा.

३०. मुख्य अधिनियमाच्या कलम ८९ मध्ये, " एक हजार रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी, " दहा हजार रुपयांपर्यंत " हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ८९ ची सुधारणा.

३१. मुख्य अधिनियमाच्या कलम ९० मध्ये, " पाचशे रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी, " पाच हजार रुपयांपर्यंत " हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ९० ची सुधारणा.

३२. मुख्य अधिनियमाच्या कलम ९५ मध्ये, " एक हजार रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी, " दहा हजार रुपयांपर्यंत " हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ९५ ची सुधारणा.

३३. मुख्य अधिनियमाच्या कलम ९६ मध्ये, " एक हजार रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी, " दहा हजार रुपयांपर्यंत " हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ९६ ची सुधारणा.

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ९७ ची सुधारणा.

**३४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ९७ मध्ये, " सिद्धापराध ठरविण्यात आले असता, " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " या दोन्ही शिक्षा होतील " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, खालील मजकूर दाखल करण्यात येईल :—

" सिद्धापराध ठरविण्यात आले असता,—

(एक) जर अशी कृती हेतुपुरस्सर केली असेल तर, तीस महिन्यांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा पंचवीस हजार रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील ; किंवा

(दोन) जर अशी कृती हयगयीने केली असेल तर, दोन वर्षांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा दहा हजार रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील. ".

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम १०४ ची सुधारणा.

**३५.** मुख्य अधिनियमाच्या कलम १०४ मधील, पोट-कलम (१) मध्ये,—

(क) " या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये " या मजकुराऐवजी " कलमे ५४ आणि ५६ यांच्या तरतुदींअन्वये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) " ६९, ७० " या मजकुराऐवजी " ६७-क, ६७-ख, ६९, ७०, ७३, ७४, ७६ " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) दुसऱ्या परंतुकाऐवजी, पुढील परंतुके दाखल करण्यात येतील :—

" परंतु असेही की, जिच्यावर तीनपेक्षा अधिक नसतील इतक्या वेळा, कलम १०८ खालील एखादा अपराध केल्याचा वाजवी संशय असेल अशा व्यक्तीच्या बाबतीत, अपराध आपसात मिटविण्यासाठी म्हणून तिच्याकडून जी रक्कम स्वीकारण्यात येईल ती रक्कम,—

(क) पहिल्या अपराधाबद्दल, तिने चुकविलेल्या शुल्काच्या किंवा फीच्या तीनपट रकमेएवढी असेल ;

(ख) दुसऱ्या अपराधाबद्दल, तिने चुकविलेल्या शुल्काच्या किंवा फीच्या चारपट रकमेएवढी असेल ;

(ग) तिसऱ्या अपराधाबद्दल, तिने चुकविलेल्या शुल्काच्या किंवा फीच्या पाचपट रकमेएवढी असेल :

परंतु तसेच, अपराध आपसात मिटविण्यासाठी म्हणून दुसऱ्या परंतुकान्वये तिच्याकडून जी रक्कम स्वीकारण्यात येईल ती रक्कम, तिने या अधिनियमान्वये भरावयाच्या शुल्काच्या किंवा फीच्या रकमेव्यतिरिक्त असेल. ".

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम १०८ ऐवजी नवीन कलम दाखल करणे.

**३६.** मुख्य अधिनियमाच्या कलम १०८ ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

शुल्क दिल्यावाचून मादक द्रव्य इत्यादी आयात करणे, निर्यात करणे, इत्यादीसाठी शास्ती.

" **१०८.** या अधिनियमानुसार लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र धारण करणारी जी कोणतीही व्यक्ती, या अधिनियमान्वये तरतूद केल्याप्रमाणे, शुल्क किंवा फी दिल्यावाचून, कोणतेही मादक द्रव्य आयात करील, निर्यात करील, त्याचे परिवहन करील, ते जवळ बाळगील, त्याची विक्री करील किंवा ते तयार करील, तिला, सिद्धापराध ठरविण्यात आले असता तिने या अधिनियमान्वये भरणे भाग असलेल्या शुल्काच्या किंवा फीच्या रकमेव्यतिरिक्त,—

(क) पहिल्या अपराधाबद्दल, एक वर्षापर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि तिने चुकविलेल्या शुल्काच्या रकमेच्या किंवा फीच्या तिपटीहून कमी नसेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल ;

(ख) दुसऱ्या अपराधाबद्दल, अठरा महिन्यांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि तिने चुकविलेल्या शुल्काच्या किंवा फीच्या रकमेच्या चारपटीहून कमी नसेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल ;

(ग) तिसऱ्या किंवा त्यानंतरच्या अपराधाबद्दल, दोन वर्षांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि तिने चुकविलेल्या शुल्काच्या किंवा फीच्या रकमेच्या पाचपटीहून कमी नसेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल. ".

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ११९ ची सुधारणा.

**३७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ११९ मध्ये, " कलमे ६५, ६७, ६७-क व ६८ " या मजकुराऐवजी, " कलमे ६५, ६७, ६७-१ क, ६७ ग, ६८, ७०, ७२ आणि ८३ " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

## निवेदन.

मुंबई दारूबंदी अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई २५) यामध्ये इतर गोष्टींबरोबरच, राज्यात दारूबंदीच्या धोरणाचे प्रचालन करणे, त्याची अंमलबजावणी करणे आणि ते अंमलात आणणे यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. या अधिनियमात विवक्षित वस्तुंवर उत्पादन शुल्क वसूल करण्यासाठी देखील तरतूद करण्यात आलेली आहे. उक्त अधिनियमाची कलमे ६५ ते १०४ आणि १०८ ही उक्त अधिनियमाच्या निरनिराळ्या तरतुदींचा भंग करून केलेले अपराध व त्याबद्दलच्या शास्ती यांच्याशी संबंधित आहेत. अलिकडे असे निदर्शनास आले आहे की, राज्यात अवैध दारूच्या उत्पादनात वाढ झालेली आहे. अशा अवैध दारूचे सेवन केल्यामुळे अनेक व्यक्तींना आपले प्राण गमवावे लागण्याच्या किंवा त्यांच्यामध्ये इतर विकलांगता येण्याच्या मोठ्या घटना मुंबई शहरात घडलेल्या आहेत.

२. या अधिनियमाखाली घडणाऱ्या अपराधांसाठी तरतूद केलेल्या बहुतांशी शास्ती या, एकतर १९४९ च्या मूळ अधिनियमाद्वारे तरतूद केल्याप्रमाणे आहेत किंवा १९६० च्या मुंबई अधिनियम क्रमांक २२ द्वारे सुधारणा केल्याप्रमाणे आहेत. अधिनियमाच्या विविध तरतुदींअन्वये तरतूद केलेल्या द्रव्यदंडाच्या रकमेत गेली पस्तीस किंवा त्याहूनही अधिक वर्षे वाढ करण्यात आलेली नाही.

अशा घटनांनंतर, आणि हा अधिनियम आणि त्याखालील नियम, विनियम यांच्या विविध तरतुदींचा किंवा आदेशांचा किंवा त्यांखाली दिलेली लायसने, परवाने, पासेस किंवा प्राधिकारपत्रे यांच्या अटी व शर्ती यांचा भंग करण्याबद्दलच्या शिक्षा कडक करण्याची तसेच, शास्तीमध्ये वाढ करण्याची मागणी करणारी, जनतेची आणि विविध सामाजिक संघटनांची अनेक अभिवेदने देखील राज्य शासनाकडे आलेली आहेत. म्हणून, राज्य शासनास उक्त आधिनियमात पुढील सुधारणा करणे इष्ट आहे असे वाटते,—

(१) अधिनियमाच्या संबंधित कलमांमध्ये कडक शिक्षेची तरतूद करून, अवैध दारू तयार करणे, ती बाळगणे, तिची वाहतूक, तिची विक्री इत्यादींची प्रभावी तपासणी करणे ;

(२) विवक्षित अपराध अजामीनपात्र करणे ; आणि

(३) तांत्रिक आणि क्षुल्लक स्वरूपाच्या विवक्षित अपराधांच्या बाबतीत अपराध आपसात मिटविण्याबाबतच्या तरतुदींमध्ये त्या खटल्याला पर्याय ठरू शकतील अशाप्रकारे सुधारणा करणे.

३. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी मुंबई दारूबंदी अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई २५) यांत आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक २६ नोव्हेबर २००५.

**एस्. एम्. कृष्णा,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**जी. एस. गिल्ल,**
शासनाचे प्रधान सचिव.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.